# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे-४११ ०११

दूरध्वनी क्र. ०२०-२६१३४९३१/२६१३५२६३ फॅक्स २६१२१५५७

जा.क्र. मकृखोविम/०९/(२५१/२०१६)/प्रशा-२/ २६०५ दिनांक : 18 JUL 2016

प्रति

| | |
|---|---|
| मा. राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण व पदसिद्ध उपाध्यक्ष, | मकृखोविम |
| मुख्य सचिव व पदसिद्ध उपाध्यक्ष | मकृखोविम |
| अप्पर मुख्य सचिव (कृषि) व सदस्य | मकृखोविम |
| अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य | मकृखोविम |
| अप्पर मुख्य सचिव (म व पू) व सदस्य | मकृखोविम |
| प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य | मकृखोविम |
| प्रधान सचिव (जसंप्र व वि) व सदस्य | मकृखोविम |
| सचिव (जसंव्य व लाक्षेवि) व सदस्य | मकृखोविम |
| सचिव (वने) व सदस्य | मकृखोविम |

**विषय: महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ९२वी बैठक दिनांक २०/०६/२०१६ - कार्यवृत्तांत व ठराव**

महोदय,

मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, मकृखोविम यांच्या अध्यक्षतेखाली दि. २०/०६/२०१६ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९२ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत व मान्य झालेले ठराव सोबत आपल्या अवलोकनार्थ व माहितीसाठी सादर करण्यांत येत आहेत. याबाबत आपले अभिप्राय ७ दिवसात कळवावेत ही विनंती.

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव.**

**(इं. रा. ब. घोटे)**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

प्रत: मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष, मकृखोविम यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२ यांना सहपत्रासह माहितीसाठी सादर.

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव**

प्रत: मुख्य अभियंता (जसं)/(विप्र), पुणे यांना सहपत्रासह माहितीसाठी.

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव**

प्रत : मा. कार्यकारी संचालक यांचे स्वीय सहाय्यक

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव**

सिंचनात् राष्ट्रोद्धार:

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-४११ ०११

## नियामक मंडळाची ९२ वी बैठक

## दिनांक २० जून २०१६

# ठराव

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९२ वी बैठक दिनांक २० जून २०१६

## ठराव

मा. ना. गिरीष महाजन, मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ९२ वी बैठक सोमवार दि. २० जून २०१६ रोजी मा. मंत्री, जलसंपदा यांचे मंत्रालयीन दालन क्र. ३०३, तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. गिरीष महाजन | ... | मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष |
| २. | मा. ना.श्री. विजय शिवतारे | ... | राज्यमंत्री, जलसंपदा व उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. डी. के. जैन | ... | अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य |
| ४. | मा. श्री. सुनिल पोरवाल | ... | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य |
| ५. | मा. श्री. आय. एस. चहल | ... | प्रधान सचिव (जसंप्र व वि) व सदस्य |
| ६. | मा. इंजि. शि. मा. उपासे | ... | सचिव (जसंव्य व लाक्षेवि) व सदस्य |
| ७. | इंजि. रा. ब. घोटे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. ता. ना. मुंडे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. खलील अन्सारी | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ३. | श्री. विरेंद्र जाधवराव | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ४. | श्री. ह. आ. ढंगारे | ... | मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव |
| ५. | श्री. म. गु. वानखेडे | ... | अधीक्षक अभियंता (मकृखोविम), पुणे |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा. मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९२ वी बैठक दिनांक २० जून २०१६

## ठराव

**ठराव क्र. ९२/१**

"ठराव करण्यात येतो की, दि. २/११/२०१५ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९१ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."

**ठराव क्र. ९२/२**

"ठराव करण्यात येतो की, दि. २७/०५/२०१५ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९०व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव क्र. ९०/२ ते ९०/९ कायम करण्यात आले."

**ठराव क्र. ९२/३**

"ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांशी संबधीत मा.महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल विधान मंडळास सादर करावयाचा असल्यामुळे सदर अहवाल व अनुपालन इ. बाबींची तपासणी वित्त विभागाकडून केल्यानंतर नियामक मंडळास विषयांकित प्रकरणे मान्यतेस्तव सादर करावे.

**ठराव क्र. ९२/४**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन २०१४-१५ या वर्षासाठीच्या १९ व्या वार्षीक अहवालास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे, तसेच सदर अहवाल राज्य शासनास सादर करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९२/५**

"महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन २०१६-१७ ते २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी सनदी लेखापालांच्या नियुक्त्यांचे अवलोकन करण्यात आले."

**ठराव क्र. ९२/६**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाकडील अतिरिक्त निधी गुंतवणूकीबाबत गुंतवणूक कार्यपध्दती व धोरण वित्त विभागाच्या निर्णय क्र.शासाउ-१०.१५/प्र.क्र.४२/ सा.उ., दिनांक २७/१०/२०१५ व दिनांक ०७/०४/२०१६ नुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सुसंगत व त्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलांनुसार महामंडळाने महामंडळ व अधिनस्त कार्यालयांसाठी लागु केलेल्या अतिरिक्त निधी गुंतवणूक धोरणाची नोंद घेतली. अतिरिक्त निधी गुंतविण्याचे नियामक मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.३/४ दि.१७.०८.१९९६ नुसार यापूर्वी कार्यकारी संचालक

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९२ वी बैठक दिनांक २० जून २०१६

यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार व अतिरिक्त निधीची अभिकरणनिहाय कमाल मर्यादेत गुंतवणूक करणे व मुदत पूर्व वटवणूकीचे अधिकार कार्यकारी संचालक यांना प्रदान करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९२/७

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे महामंडळाकडील बीड व उस्मानाबाद जिल्हयातील प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी प्रस्तावांची तपासणी करुन नियामक मंडळासमोर नियामक मंडळाचा एक भाग म्हणून अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त), प्रधान सचिव (नियोजन) व प्रधान सचिव (जलसंपदा) या तीन सचिवांची एक समिती नेमण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९२/८

"ठराव करण्यात येतो की, टेमघर धरणातुन होत असलेल्या गळतीबाबत उपाय योजना सूचविणेसाठी स्थापन करण्यात आलेल्या तज्ञ समितीस दिनांक ३०-०६-२०१६ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९२/९

"ठराव करण्यात येतो की, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक अंतर्गत या महामंडळाकडील अनेक सिंचन प्रकल्पांची कामे मोठया प्रमाणात संकल्पनासाठी संदर्भित केली जातात. या कामासाठी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी मागणी केल्याप्रमाणे GEOSLOPE: Standard (BUNDLE२) SLOPE / WSEEP /WSIGMA / W संगणक अज्ञावली तीन ऐवजी एक व उर्वरित संगणक अज्ञावली मागणी केल्याप्रमाणे देण्यात यावीत. तसेच शासन निर्देशांच्या अनुषंगाने उपरोक्त संगणक आज्ञावली व प्रणाली तसेच उपकरणे इ. मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेसव महामंडळास उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच याबाबतचा खर्च महामंडळांतर्गतच्या उपलब्ध तरतुदीतुन करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९२/१०

"ठराव करण्यांत येतो की, निलेगांव सा. त. मधील संपादित केलेल्या गट नं.२८ मधील श्री. रमेश अर्जुन कोळी, रा. निलेगांव यांचे भूसंपादन प्रकरणात अंतिम निवाडयातून वगळलेल्या विहिरींचा रु.५८२६०/- (रु. अठ्ठावन्न हजार दोनशे साठ फक्त) मोबदला अदा करण्यासाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९२ वी बैठक दिनांक २० जून २०१६

ठराव क्र. ९२/११

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे मालकीची मौजे कुळधरण ता.कर्जत वसाहतीमधील विना वापर ८ सदनिका (क्षेत्रफळ २००० चौ.फु.) ३ गोडाऊन (क्षेत्रफळ ९०० चौ.फु.) व मोकळी जागा (क्षेत्रफळ १२५०० चौ.फु.) श्री.बालाजी एजन्सी पुणे यांना निविदा शर्त ५ (ब) नुसार महामंडळाचे प्रचलित दराने ११ महिने कालावधीसाठी भाडेपट्टयाने हस्तांतरण करणेबाबत नियमानुसार क्षेत्रीय कार्यालयाने कार्यवाही केली आहे व सदरची वस्तु:स्थिती नियामक मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आली असून अशा प्रकारचे निर्णय निविदेतील अटी व शर्ती नुसार असल्यास कार्यकारी संचालक यांनी याबाबत निर्णय घ्यावेत."

ठराव क्र. ९२/१२

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या मालकीची मौ.वडगांव बु// ता.हेवली येथील नविन व जुना मुठा कालव्यासाठी संपादित स.नं.४३/१ ब व ४३/१ क मधील १५०० चौ.फू. मोकळी जागा सिंहगड तांत्रिक शिक्षण संस्थेस बिगर सिंचन पाणी आरक्षण व पाणी उपसा करण्याच्या प्रस्तावास शासन स्तरावरुन पत्र क्र. बीकेएस २००७/(९०४/२००७) सिं.व्य (धो) दि. १४/०५/२००७ नुसार मान्यता देण्यात आलेली असल्यामुळे महामंडळाचे प्रचलित दराने पंप हाऊसचे कामासाठी वार्षिक भाडेपट्टयाने देणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९२/१३

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे मालकीची मौजे वडगांव बु. // स. नं. ६१ मधील हद्दीतील ६० x ३० = १८०० चौ. फू. मोकळी जागा काशिबाई नवले कॉलेज व हॉस्पिटल मौजे न-हे आंबेगांव या शैक्षणिक संस्थेस बिगर सिंचन पाणी आरक्षण व पाणी उपसा करण्याच्या प्रस्तावास शासन स्तरावरुन पत्र क्र. बीकेएस २००९/(३२४/०९) सिंव्य (धो) दि. ०५/०१/२००९ नुसार मान्यता देण्यात आलेली असल्यामुळे महामंडळाचे प्रचलित दराने पंप हाऊस व जॅकवेलसाठी वार्षिक भाडेपट्टयाने देणेबाबत नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९२/१४

महामंडळाच्या मालकीची मौजे वेण्णानगर ता.जि.सातारा येथील वसाहती मधील दक्षिण पुर्व बाजूची २३,२८१ चौ.मी. संपादित जमिन अस्तित्वात असलेल्या तात्पुरत्या बांधकामासह व मोकळया जागेसह महसुल विभागाचे सहमतीने विपश्यना प्रशिक्षण व संशोधन न्यास सातारा यांना भाडेपट्टयाने देण्याचा प्रस्ताव शासनास महामंडळाचे पत्र क्र.मकृखोविम/३९/(४९०/ २०१५)/आ-७/१०२१ दि. १४/३/२०१६ अन्वये सादर करण्यात आला होता. सदर प्रकरणी न्यायालयाचा अंतिम निर्णय झाला नसल्यामुळे सदर प्रकरणी कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."

"मान्य"

| | |
|---|---|
| कार्यकारी संचालक<br>म.कृ.खो.वि.म, पुणे | मा.मंत्री, जलसंपदा<br>व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९२ वी बैठक दिनांक २० जून २०१६

ठराव क्र. ९२/१५

"महामंडळांचे मालकीची वारणावती कॅनाल व कॉलनी येथील विनावापर इमारती व मोकळी जागा क्षेत्रफळ १,७७,२१०.२० चौ. फू. वसंत सागर पर्यटन व विकास संस्था, शिराळा, जि. सांगली या संस्थेस शासनाचे / महामंडळाचे प्रचलित दराने भाडेपट्टा कराराने देण्याच्या प्रस्तावाबाबत धोरणात्मक बाब म्हणून शासनाचे दि. ३०/०९/२००८ च्या पत्रान्वये याचिकेवरील अंतिम न्याय निर्णय होईपर्यंत जमीन वाटपाबाबत कोणतीही कार्यवाही न करणेबाबत सूचित केले आहे. त्याबाबतची वस्तु:स्थिती नियामक मंडळाच्या निदर्शनास आणली आहे. सदर प्रस्तावाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आलेला नाही.

ठराव क्र. ९२/१६

महामंडळांचे मालकीची मोरणा कॉलनी शिराळा, जि. सांगली वसाहतीमधील विनावापर ६ इमारती (क्षेत्रफळ ७१०२.६१ चौ. फू.) शासनाचे / महामंडळाचे प्रचलित दराने कै. यशवंतराव नाईक प्रतिष्ठान संचलित यशवंत बालक मंदिर व शिवाजी पब्लिक स्कूल शिराळा या संस्थेस भाडेपट्टा कराराने देण्याच्या प्रस्तावाबाबत धोरणात्मक बाब म्हणून शासनाचे दि. ३०/०९/२००८ च्या पत्रान्वये याचिकेवरील अंतिम न्याय निर्णय होईपर्यंत जमीन वाटपाबाबत कोणतीही कार्यवाही न करणेबाबत सूचित केले आहे. त्याबाबतची वस्तु:स्थिती नियामक मंडळाच्या निदर्शनास आणली आहे. सदर प्रस्तावाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आलेला नाही.

ठराव क्र. ९२/१७

"ठराव करण्यात येतो की, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता महामंडळाचे मालकीची मौजे फुरसुंगी, ता. हवेली येथील स. नं. २१९/३अ, २१९/३ब व २१९/४ब मधील विनावापर २० आर जागेची चालू मुल्यांकनानुसार होणारी किंमत जीवन प्राधिकरण, पुणे यांचेकडून महामंडळास मिळालेनंतर सदर २० आर जागा जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास कायमस्वरुपी सार्वजनिक पाणी पुरवठा टाक्यांचे बांधकामासाठी देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९२/१८

"ठराव करण्यात येतो की, जलसंपदा विभागाच्या ताब्यातील राधानगरी प्रकल्प, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर प्रकल्पांतर्गत धरणाचे उजव्या तीरावरील अधोबाजूकडील संपादित जमिनीतील गट क्र. २२७ मधील ८६० चौ.मी. जागेवर सदरची जागा ही जिल्हापरिषद, कोल्हापूर यांना भाडेतत्वावर देण्याची मागणी आहे. तथापि ही जागा धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने निषिद्ध क्षेत्रातील असल्याने सदरची जागा धरण सुरक्षिततेमुळे मागणीप्रमाणे जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना देणे योग्य नसल्याने धरण प्रतिबंधित क्षेत्राबाहेर रस्त्यालगत जागा उपलब्ध असल्यास क्षेत्रिय

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ९२ वी बैठक दिनांक २० जून २०१६

अधिकारी / जिल्हा परिषद पदाधिकारी यांनी स्थळ निश्चितीबाबत पहाणी करुन पर्यायी जागा उपलब्ध होणेबाबतची शक्यता पडताळून पहावी"

ठराव क्र. ९२/१९

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाचे जमीनी वाटपाबाबत झालेल्या अनियमिततेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेली जनहित याचिका क्र. १४८/२००६ चा अंतिम न्याय होईपर्यंत खाजगी व्यक्ती / संस्था जमीनी वाटपाबाबत अथवा भाडेपट्टयाने देणेबाबतची कोणतीही कार्यवाही न करणेबाबत शासन पत्र क्र. संकीर्ण.२००८ / मुमसं.४३ / (२७९/०८)/ सिं.व्य. (म.) दि. ३०-०९-२००८ अन्वये महामंडळास सुचित करण्यांत आले आहे. सदर शासन पत्रातील निर्देशानुसार महामंडळाच्या अतिरिक्त जमीन मागणीबाबतचे खाजगी व्यक्ती / संस्थेचे प्रस्ताव अथवा निवेदनांवर नियामक मंडळाचे मान्यतेस्तव सादर करणे संयुक्तीक नसल्याबाबतची वस्तुस्थिती विचारात घेता यापुढे न्यायालयाचे अंतिम निकाल व त्याअनुषंगाने शासनाचे सुधारीत निर्देश प्राप्त होईपर्यंत असे प्रस्ताव नियामक मंडळाचे मान्यतेसाठी सादर करु नयेत."

"मान्य"

| | |
|---|---|
| (इंजि. रा. ब.घोटे) | (गिरीष महाजन) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |